## सीबीएसईत डोंबिवलीची दीक्षा सुवर्णाला ९९.६ टक्के गुण

**डोंबिवली:** महाराष्ट्रात २०२१-२२ सीबीएसई मधून डोंबिवलीची दीक्षा सुवर्णा प्रथम ९९.६ टक्के गुण मिळवून महाराष्ट्रातूनच पहिली आली आहे. डोंबिवलीतील होली एंजल्स शाळेतून शिकलेल्या दीक्षाचा शाळेत विद्यार्थी व पालकांच्या उपस्थिती सत्कार करण्यात आला.

### थो | ड | क्या | त महत्त्वाचे

## मराठी शाळेतील संरक्षण भिंतीचे उद्घघाटन

**मुरुड :** मुरुड तालुक्यातील मजगाव ग्रामपंचायत हद्दीमध्ये रायगड जिल्हा परिषद मराठी शाळेच्या संरक्षक भिंत जिल्हा नियोजन मंडळाचे १६ लाख रुपये खर्च करून बांधण्यात आली आहे. या संरक्षक भिंतीचे उद्घाटन आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले, तर उपसरपंच प्रीतम पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आले. यावेळी सरपंच पवित्रा चोगले, उपसरपंच प्रीतम पाटील, भाई सुर्वे, अमीत कोळी, अभिनव कोळी, गट विकास अधिकारी सुभाष वाणी, शाम पाटील, भरत बेलोसे, मुख्याध्यापक म्हात्रे गुरुजी संतोष बुलु, शुभांगी करडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## परिवहन बस डेपोला नाना शंकरशेट यांचे नाव

**भाईदर :** मीरा-भाईंदर महापालिकेच्या घोडबंदर येथील परिवहन सेवेच्या बस डेपोला जगन्नाथ नाना शंकरशेट यांचे कार्य तसेच देशासाठी दिलेले योगदान महान होते, घोडबंदर बस डेपो ला त्यांचे नाव देण्यात आले आहे. घोडबंदर बस डेपोचे नामदार जगन्नाथ नाना शंकरशेट बस डेपो असे नामकरण महापौर ज्योत्स्ना हसनाळे यांच्या हस्ते पार पडले.

## रिक्षा चोरीला

**कर्जत :** नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील डिकसळ येथील प्रवीण म्हसे या रिक्षाचालकांची रिक्षा घराच्या बाहेर उभी केलेली असताना चोरीला गेली आहे. याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथील पोलिसांनी असून सर्व भागातील सर्व सीसीटीव्ही यांची तपासणी सुरु केली आहे. डिकसळ येथील रोहित ढाबा समोर प्रवीण म्हसे हे रिक्षा व्यवसाय करतात.

# रसातळाला गेलेल्या काँग्रेसला उभारी देण्याची कसरत

## विविध प्रश्नांवर आंदोलने करत संघटन वाढवण्यावर भर



**विशेष प्रतिनिधी/ठाणे**

ठाणे जिल्ह्यात काँग्रेस पक्षाची अवस्था अत्यंत बिकट आहे. जिल्ह्यात एकही खासदार अथवा आमदार निवडून आलेला नाही. भिवंडी महानगरपालिका वगळता एकाही महापालिका, नगरपालिकेवर काँग्रेसची सत्ता नाही, ठाणे महापालिकेत अवघे तीन नगरसेवक निवडून आलेले आहेत. दरम्यान, पालिका निवडणुकांचा कार्यक्रम कोणत्याही क्षणी घोषित होणार असताना गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसला संजीवनी देण्याची कसरत नव्याने सुरु करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसात महागाई, बेरोजगारी, जनसामान्यांचे विविध प्रश्न या संदर्भात रस्त्यावर उतरून आंदोलन छेडण्यात येत असून संघटन वाढवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत.

### महाविकास आघाडी झाल्यास काँग्रेसला संजीवनी ?

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या आमदारांचा गट फोडून भाजपसोबत सरकार स्थापन केले असल्याने शिंदे समर्थक नगरसेवक भाजपसोबत युती करून निवडणूक लढण्याची शक्यता आहे. त्यामुळे, ठाण्यात शिवसेना राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांची महाविकास आघाडी होण्याची शक्यता असून अशी आघाडी झाल्यास काँग्रेसला संजीवनी मिळू शकते.

२०१७ च्या महापालिका निवडणुकीपूर्वी ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष पद जवळपास दीड वर्षे रिक्त होते. बरीच गटबाजी असल्याने अध्यक्ष जाहीर न करता सहा जणांची कार्यकारी समिती नेमण्यात आली होती. जवळपास दीड वर्षे अध्यक्षा शिवाय काँग्रेसचा कारभार सुरु होता. मात्र, महापालिका निवडणुका येताच प्रदेश कमिटीवर असलेले जेष्ठ नगरसेवक मनोज शिंदे यांच्यावर अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. मात्र, त्या पालिका निवडणुकीत काँग्रेसचे अवघे ३ नगरसेवक निवडून आले. त्यामुळे दोन वर्षांपूर्वी वर्तकनगर परिसरातील काँग्रेस नगरसेवक विक्रांत चव्हाण यांच्यावर अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली. अडीच वर्षे राज्यात काँग्रेस शिवसेना आणि राष्ट्रवादीचे महाविकास आघाडीचे सरकार राज्यात सत्तेत असतानाही ठाणे जिल्ह्यात मात्र काँग्रेस कुठेच दिसत नव्हती. सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सरकारमधील दुसऱ्या क्रमांकाचे नगरविकास मंत्रिपद होते. तर, जितेंद्र आव्हाड यांच्यावर गृहनिर्माण मंत्रिपदाची महत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. मात्र, जिल्ह्यात काँग्रेस मात्र कोरी होती.

दोन वर्षांपासून जिल्ह्यातील काँग्रेसची ताकद वाढवण्याची जबाबदारी नगरसेवक विक्रांत चव्हाण यांच्यावर सोपवण्यात आली आहे. चव्हाण यांनी जबाबदारी स्वीकारताच मुंब्रा या हक्काच्या गडावर लक्ष केंद्रित केले आणि त्यांनी राष्ट्रवादीत गेलेल्या नईम खान यांना पुन्हा काँग्रेस मध्ये आणून राष्ट्रवादीला पहिला झटका दिला आहे. गेल्या काही महिन्यात विविध आंदोलनाच्या माध्यमातून काँग्रेसने आपले अस्तित्व दाखवायला सुरवात केली असून जिल्हा सरचिटणीस आणि प्रवक्ते सचिन शिंदे तसेच महिला आघाडीच्या माध्यमातून जनसामान्यांचे विविध प्रश्नावर रस्त्यावर उतरून आंदोलन छेडण्यात येत आहेत.

# प्राचीन शिवमंदिरात रांगेवरून झाला वाद



**वार्ताहर/उल्हासनगर**

प्राचीन शिव मंदिरात दर्शन रांगेवरुन कावडिया आणि स्थानिक यांच्यात वाद निर्माण झाला होता. पोलीस आणि मंदिराचे पुजारी यांच्या हस्तक्षेपानंतर वाद निवळला. उल्हासनगर आणि अंबरनाथ शहराच्या सीमेवर प्राचीन शिवमंदिर आहे. मागील काही वर्षांपासून कल्याण, डोंबिवली आणि दिवा येथून मोठ्या प्रमाणात कावडीया यात्रेकरू शिवमंदिरात येतात. हे कावडीया यात्रेकरू थेट मंदिरात नवीन रांग बनवून शिरतात. त्यामुळे गेल्या अनेक तासांपासून ताटकळत रांगेत उभे असलेल्या भाविकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो.

दर्शनासाठी मोठ्या संख्येने उल्हासनगर, अंबरनाथ, कल्याण, कल्याण ग्रामीण परिसरातील शिवभक्त येत असतात. या भक्तांनी मंदिरात दर्शनासाठी सकाळपासून रांग लावली होती. सुरुवातीला कावडियांची संख्या थोडी असेल, असे समजून जुन्या रांगेतील भाविक शांत राहिले, मात्र कावडियांची संख्या हजारोंच्या घरात असल्याने जुन्या रांगेतील भाविकांचा बांध फुटला आणि वाद सुरू झाला.

### पोलिसांचा हस्तक्षेप

शिवमंदिराचे पुजारी आणि माजी नगरसेवक विजय पाटील यांनी वाद संपविण्याचा प्रयत्न करीत रांग लावली. मात्र परिस्थिती हाताबाहेर जात असल्याने अखेर शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भोगे आणि त्यांच्या पोलीस पथकाने पाचारण करित रांग लावल्यानंतर वाद निवळला.

# कळवा पुलाखालील झोपड्या जमीनदोस्त

## कांदळवनात बांधलेल्या अनधिकृत ५७ झोपड्यांवर पालिकेची कारवाई



**प्रतिनिधी/ठाणे**

ठाणे महापालिका क्षेत्रातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करणे अत्यंत महत्वाचे असून कांदळवनावर अतिक्रमण झाल्यास त्यावर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी दिल्यानंतर सोमवारी कळवा पुलाखाली कांदळवनात बांधलेल्या अनाधिकृत ५७ झोपड्यांवर आज निष्कासानाची कारवाई करण्यात आली.

सदर कारवाई अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली उप आयुक्त शंकर पाटोळे, सहाय्यक आयुक्त अजय एडके, प्रदूषण नियंत्रण अधिकारी मनीषा प्रधान यांनी अतिक्रमण विभाग व प्रदूषण विभागाचे कर्मचारी यांच्या साहाय्याने केली. शहराच्या खाडी किनारी लगत दिवसेंदिवस झोपड्या वाढत आहेत. परराज्यातून तसेच ग्रामीण भागातून नागरिक शहारत स्थलांतरित होत असतात आणि त्यानंतर अश्या झोपड्या वाढत असतात. यासंदर्भात अनेक तक्रारी देखील होत असल्याने पालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई केली असल्याचे सांगण्यात आले.

## आरोग्य केंद्रात सुरक्षारक्षकाला मारहाण

**कर्जत :** तालुक्यातील नेरळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रात्रीच्या सुरक्षेवर असलेल्या कर्मचाऱ्याला मध्यरात्री आलेल्या तीन मध्यधुंद व्यक्तींनी मारहाण केली. अगदी रक्तबंबाळ करेपर्यंत मारहाण झाल्यानंतर सुरक्षा रक्षकाने नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून सर्व थरातून त्या प्रकरणाबद्दल संताप व्यक्त केला जात आहे.

# अट्टल घरफोडी करणारे चौघे गजाआड

## सहा गुन्ह्यांतील साडेबारा लाखांचा मुद्देमाल हस्तगत



**वार्ताहर/उल्हासनगर**

भाचीच्या वाढदिवसाला आलेल्या मामाने तीन सहकाऱ्यांच्या मदतीने तीन दिवसांत सहा घरफोड्या केल्या. पोलिसांच्या सूत्राने दिलेल्या माहितीच्या आधारे, नेवाळी गावातील चाळीतून चार जणांना ताब्यात घेत त्यांच्याकडून सहा घरफोडीत चोरी केलेले साडे बारा लाख रुपयांचे सोन्या चांदीचे दागिने आणि रोख रक्कम हस्तगत केली आहे.

मूळचा नांदेडचा असलेला राजू मिरे हा नेवाळी येथे बहिणीच्या घरी आला होता. तिथे त्याने त्याचा सहकारी परमेश्वर गायकवाड, प्रकाश पवार आणि एका अल्पवयीन सहकाऱ्यांच्या मदतीने विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत चार, हिललाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन आणि मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक घरफोडी केली. अवघ्या तीन दिवसांत सहा घरफोड्या झाल्याने पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, सहाय्यक आयुक्त जगदीश सातव, मोतीचंद राठोड यांनी स्थानिक पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांना आरोपींना गजाआड करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार हिललाईन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित डेरे यांनी पोलीस निरीक्षक राजेश खेरडे, ज्ञानेश्वर माळी, पोलीस हवालदार अजय गायकवाड, पोलीस नाईक प्रमोद कांबळे, चंदू शिंदे, गौतम कारकुड, बाबू जाधव, सुभाष घाडगे, नवनाथ काळे याना तपासाचे आदेश दिले. माहिती तपासल्यानंतर पोलीस पथकाने नेवाळी गावातील चाळीत धाड टाकून चार जणांना ताब्यात घेतले. त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच त्याच्याकडून १२ लाख ७३ हजार रुपयांचे सोन्या चांदीचे दागिने आणि रोख रक्कम हस्तगत केली. या आरोपीपैकी राजू मिरे याचे विरुद्ध तेलंगणा राज्यात सात गुन्हे आणि परमेश्वर गायकवाड याच्या विरोधात नांदेड पोलीस ठाण्यात एक गुन्हा दाखल असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित डेरे यांनी दिली.

# कलाविष्काराने ठाण्यात 'स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव'



**प्रतिनिधी/ठाणे**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्र व राज्य शासनाच्यावतीने मार्गदर्शक सुचनेनुसार ठाणे शहरात ठाणे महानगपालिका व विविध सामाजिक संस्थेच्या विद्यमाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा,वक्तृत्व, निबंध, चित्रकला स्पर्धा, चित्र प्रदर्शन, नृत्य, बाईक रॅली, मॅरेथॉन अशा विविधांगी 'स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव" साजरा करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी दिली. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त १३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत 'हर घर तिरंगा' व स्वराज्य महोत्सव अभियान शहरात राबविण्यात येणार आहे. यानिमित्त शहरातील विविध सामाजिक संस्थेच्या सहकार्याने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या सर्व सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक आज महापालिका आयुक्तांच्या दालनात संपन्न झाली.या बैठकीस माजी महापौर नरेश गणपत म्हस्के, उप आयुक्त बाळासाहेब चव्हाण, उप आयुक्त(प्र.) मीनल पालांडे यांच्यासह स्वत्व संस्थेच्या ॲड स्वाती दिक्षीत, विनोद शर्मा, चिराग शहा, ज्योती कोटक, सई देव, निकिता भागवत, आशा सुनील कुमार, मनाली देव आदी विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# खासदार विचारेंच्या बॅनरमधून मुख्यमंत्री गायब

## आम्ही मातोश्रीसोबत असल्याचे विचारेंचे शिक्कामोर्तब



**वार्ताहर/ठाणे**

राज्यातील सत्तात्तांतर सेनेमध्ये दोन गट पडले असताना ठाण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात बोलण्याचे धाडस आतापर्यंत कोणी केले नाही. असे असताना ठाणे लोकसभा खासदार राजन विचारे यांनी आपण 'मातोश्री' सोबत आहोत असा विश्वास दिला होता. मात्र, आतापर्यंत कधीच उघडपणे विचारे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली नव्हती, मात्र शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त खासदार राजन विचारे यांनी ठाण्यात बॅनरबाजी करून आम्ही ठाकरे सोबत असल्याचे शिक्कामोर्तब केले आहे. मासुंदा तलावपाळी येथे लावण्यात आलेला बॅनर सर्वांचे लक्ष वेधून घेत असून या बॅनरमध्ये राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेचा फोटो नसल्याने विचारे फक्त मातोश्रीसोबत असल्याचे दिसत आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर राज्यभरातून शिंदे गटाला वाढता पाठिंबा मिळत आहे. आमदार, खासदार नगरसेवक, युवासेना, पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेसोबत जाताना दिसत आहेत. दरम्यान, ठाणे जिल्ह्यात एकनाथ शिंदे यांचे वर्चस्व असून एकनाथ शिंदेंनाच पाठिंबा देत आहेत.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस आज, २७ जुलै रोजी आहे. राज्यभर हा वाढदिवस दरवर्षी साजरा करण्यात येतो, मात्र यंदा हा वाढदिवस शपथपत्राची भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मात्र ठाण्यात आतापर्यंत एकच बॅनर लावण्यात आला असून चर्चा सुरु झाली आहे. शिंदे यांच्या गटाला ठाणे शहरातील असंख्य शिवसैनिकांनी व पदाधिकाऱ्यांनी आपले समर्थन दर्शवलेले आहे.

**TATA STEEL LIMITED**

**Registered Offce:** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

**३० जून, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

₹ कोटी

| तपशील | ३०.०६.२०२२ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२२ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०२१ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२२ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|
| | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ३२,०२१.०९ | ३६,६८०.९३ | २७,६८९.५५ | १,२९,०२१.३५ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ८,२३७.३३ | १०,७१५.०४ | ११,४३७.०० | ४४,३२६.१० |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ८,१८२.५३ | १०,६३८.५९ | ११,५८९.६८ | ४४,०९०.६५ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ६,११४.१७ | ७,८३९.४६ | ८,७८०.०७ | ३३,०११.१८ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | ६,११७.९९ | ८,१८७.१५ | ८,८१०.६८ | ३३,७०६.०८ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,२२२.३७ | १,२२२.३७ | १,२०३.०४ | १,२२२.३७ |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | १,२४,२११.३९ |
| सिक्युरिटीज प्रिमियम रिझर्व्ह | ३१,२८८.८९ | | ३१,२२२.०० | ३१,२८८.८९ |
| नेट वर्थ | १२५,३१८.६५ | १२५,४३३.७६ | १००,४७०.३३ | १,२५,४३३.७६ |
| भरणा झालेले कर्ज भांडवल | १०,९०९.९३ | | १३,५९४.४४ | १३,६७४.९९ |
| निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो | ०.३० | ०.३० | ०.३६ | ०.३० |
| प्रति समभाग प्राप्ती: | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर) | ५०.०३ | ६४.१४ | ७२.०२ | २७०.३३ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ५०.०१ | ६४.१२ | ७१.९२ | २७०.१३ |
| डिबेंचर विमोचन राखीव | २,०४६.०० | २,०४६.०० | २,०४६.०० | २,०४६.०० |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | २.३४ | १०.८२ | १४.२१ | १४.३६ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | १९.८० | २८.८३ | १९.४३ | २२.८४ |

**३० जून, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

₹ कोटी

| तपशील | ३०.०६.२०२२ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२२ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०२१ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२२ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ६३,४३०.०७ | ६९,३२३.५० | ५३,४६५.४३ | २४३,९५९.१७ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ११,९४५.५० | १२,१३९.२६ | १२,२५९.०८ | ५०,३६०.९३ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ११,९०६.२६ | ११,८६४.९७ | १२,०७६.७५ | ५०,२२६.८७ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ७,७१४.०० | ९,८३५.१२ | ९,७६८.३४ | ४१,७४९.३२ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | १,१०३.०९ | १०,३५३.७४ | १०,३८२.८६ | ४३,०५४.७४ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,२२१.२१ | १,२२१.२१ | १,२०१.८७ | १,२२१.२१ |
| राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रक व्याज | | | | ११५,८७७.२५ |
| नेट वर्थ | १०९,३६१.९२ | ११४,४४३.०४ | ८०,२४२.१४ | ११४,४४३.०४ |
| निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो | ०.४८ | ०.५२ | ०.९१ | ०.५२ |
| प्रति समभाग प्राप्ती: | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ६३.५९ | ७९.९१ | ७४.२४ | ३३२.३५ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ६३.५७ | ७९.८८ | ७४.१३ | ३३२.०९ |
| डिबेंचर विमोचन राखीव | २,०४६.०० | २,०४६.०० | २,०४६.०० | २,०४६.०० |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | ३.२६ | ९.७४ | ७.१६ | ९.१८ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | १८.२५ | १७.५९ | ९.२७ | १२.८२ |

**टीप :**
सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ आणि रेग्युलेशन ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

**टी. व्ही. नरेंद्रन**
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक

**कौशिक चॅटर्जी**
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

मुंबई : २५ जुलै, २०२२

TATA STEEL

# गर्भवतींसाठी लोहघटकयुक्त आहार महत्त्वाचा

आरोग्यवार्ता

**नवी दिल्ली :** रक्तक्षय (ॲनिमिया) किंवा रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असल्याने आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण होतात. भारतात विशेषतः स्त्रियांमध्ये त्याचे प्रमाण जास्त आढळते. त्यामुळे गर्भवती आणि स्तनदा मातांनी पोषक आहारात रक्तातील लोहघटक वाढवणाऱ्या आहाराचाही समावेश करण्याची गरज असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

हरभरा किंवा किंवा काळ्या चण्यांत याचे मुबलक प्रमाण असते. गर्भावस्थेत पोषणमूल्ये असणारे लोहघटक, तंतूयुक्त आहार, कॅल्शियम, प्रथिने, जीवनसत्त्वे मिळणे गर्भवती व गर्भाच्या पोषणासाठी महत्त्वाचे असते. त्यासाठी आहारतज्ज्ञांच्या सल्ल्याने दुग्धजन्य पदार्थ, दूध, भाज्या, फळे, कडधाने, सुकामेवा,तसेच ज्यांना शक्य आहे त्यांनी मांसाहार करावा.आहारतज्ज्ञांच्या मते हरभरे-काळ्या चण्यांमुळे रक्तक्षय रोखण्यास मदत होते. त्यामुळे त्याचा समावेश असलेला आहार गर्भवती व स्तनदा मातांसाठी लाभदायक असतो.

काळ्या चण्यांत लोहघटकांसह तंतुमय घटकही मोठ्या प्रमाणावर असतात. त्यामुळे पोट साफ राहते. पोटाच्या आरोग्यासह मधुमेह रोखण्यासही त्यांचा उपयोग होतो. त्यांच्यात नैसर्गिक वनस्पतिजन्य प्रथिने असतात. त्यामुळे केसगळती रोखण्यास मदत होते. काळ्या चण्यांच्या आहाराने त्वचेचे आरोग्यही चांगले राहते. उकडलेले काळे चणे, कापलेले टोमॅटो, काकडी, ढोबळी मिरचीच्या साह्याने तयार केलेल्या आहारात वरून लिंबू पिळून घेतल्यास शरीराला उपयुक्त लोहघटक मिळण्यास मदत होते. हिरव्या फळभाज्या, पालेभाज्यांतून जीवनसत्त्वे, लोह, तंतुमय पदार्थ मुबलक प्रमाणात मिळतात. ताजी फळे खाल्ल्याने त्यातून अत्यावश्यक जीवनसत्त्वे, क्षार, ऑक्सिडीकरण विरोधी घटक (अँटी ऑक्सिडंट) हे घटक मिळतात. गर्भवतींसाठी ते लाभदायक असतात.







# ‘कांदळवनासारखे मजबूत सरकार’

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** समुद्रकिनाऱ्यावर मजबुतीने कांदळवने उभी आहेत. तसेच आमचे सरकार मजबुतीने उभे राहिले आहे. वादळे आली तरी कोणताही परिणाम होणार नाही. सरकार सामान्य लोकांसाठी काम करणार आहे. कांदळवनातून उपजीविका आणि कांदळवनाचे संवर्धन दोन्हीकडे लक्ष देत आहोत. विकास कामे जरी असतील तरी पर्यावरणाचे संवर्धन राखले जाईल, असे मंगळवारी सह्याद्री अतिथिगृहातील कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

आंतरराष्ट्रीय कांदळवन परिसंस्था संवर्धन दिनानिमित्त मंगळवारी सह्याद्री अतिथिगृहात कांदळवनांचे आणि संबंधित परीसंस्थेचे संवर्धन करणाऱ्या नागरिकांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यासह या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वनेचे प्रधान सचिव वने वेणूगोपाल रेड्डी, महाराष्ट्र वन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक एन वासुदेवन, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) वाय. एल. पी. राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सुनील लिमये अतिथी म्हणून उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, देशातील पहिले आणि एकमेव राज्य महाराष्ट्र राज्य आहे, जिथे कांदळवन कक्ष आणि प्रतिष्ठान आहे. गेल्या काही वर्षांपासून ७४ टक्क्यांनी कांदळवनाची वाढ झाली आहे. यापुढेही कांदळवनाकडे दुर्लक्ष केले जाणार नाही. या वनात राडारोडा, बांधकामातील टाकाऊ सामग्री फेकली जाते. यापुढे असे करू देणार नाही. खासगी कांदळवनाच्या जागादेखील संरक्षित केल्या जातील. एमटीएनएल येथे फ्लेमिंगो येतात. त्याचे देखील संवर्धन झाले पाहिजे.

# डीएसके यांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन

**मुंबई :** ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणात बांधकाम व्यावसायिक दीपक सखाराम कुलकर्णी ऊर्फ डीएसके यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. त्यामुळे चार वर्षांहून अधिक काळ कारागृहात असलेल्या डीएसकेंना दिलासा मिळाला आहे. न्यायमूर्ती एस. अब्दुल नाझीर आणि न्यायमूर्ती जे. के. महेश्वरी यांच्या खंडपीठाने डीएसकेंची जामिनावर सुटका करण्याचे आदेश दिले.




# मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यातील आणखी एक साक्षीदार फितूर

**मुंबई :** मालेगाव येथे २००८ साली झालेल्या बॉम्बस्फोटांशी संबंधित खटल्यात आणखी एक साक्षीदार फितूर झाला. या साक्षीदाराने खटल्यातील प्रमुख आरोपी ले. कर्नल प्रसाद पुरोहित याची ओळख पटवण्यास नकार दिला. खटल्यातील फितूर साक्षीदारांची संख्या २३ झाली आहे. या प्रकरणाचा सुरुवातीला तपास करणाऱ्या राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाच्या (एटीएस) अधिकाऱ्यांनी ३० ऑक्टोबर २००८ मध्ये आपल्याला घरातून बेकायदा ताब्यात घेतले. आपल्या कुटुंबीयांचाही त्यांनी छळ केला. आपल्याला खोट्या प्रकरणात गोवण्याचे धमकावण्यात आल्याने त्यावेळी या अधिकाऱ्यांविरोधात आपण तक्रार केली नाही, असा दावा साक्ष नोंदवताना केला.




TATA

**TATA STEEL LIMITED**

**Registered Offce:** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

## ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

| तपशील | ३०.०६.२०२२ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२२ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०२१ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२२ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|
| | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ३२,०२१.०९ | ३६,६८०.९३ | २७,६८९.५५ | १,२९,०२१.३५ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ८,२३७.३३ | १०,७१५.०४ | ११,४३७.०० | ४४,३२६.१० |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ८,१८२.५३ | १०,६३८.५९ | ११,५८९.६८ | ४४,०९०.६५ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ६,११४.१७ | ७,८३९.४६ | ८,७८०.०७ | ३३,०११.१८ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | ६,११७.९९ | ८,१८७.१५ | ८,८१०.६८ | ३३,७०६.०८ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,२२२.३७ | १,२२२.३७ | १,२०३.०४ | १,२२२.३७ |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | १,२४,२११.३९ |
| सिक्युरिटीज प्रिमियम रिझर्व्ह | ३१,२८८.८९ | | ३१,२२२.०० | ३१,२८८.८९ |
| नेट वर्थ | १२५,३१८.६५ | १२५,४३३.७६ | १००,४७०.३३ | १,२५,४३३.७६ |
| भरणा झालेले कर्ज भांडवल | १०,९०९.९३ | | १३,५९४.४४ | १३,६७४.९९ |
| निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो | ०.३० | ०.३० | ०.३६ | ०.३० |
| प्रति समभाग प्राप्ती: | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर) | ५०.०३ | ६४.१४ | ७२.०२ | २७०.३३ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ५०.०१ | ६४.१२ | ७१.९२ | २७०.१३ |
| डिबेंचर विमोचन राखीव | २,०४६.०० | २,०४६.०० | २,०४६.०० | २,०४६.०० |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | २.३४ | १०.८२ | १४.२१ | १४.३६ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | १९.८० | २८.८३ | १९.४३ | २२.८४ |

## ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

| तपशील | ३०.०६.२०२२ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२२ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०२१ रोजी संपलेली तिमाही | ३१.०३.२०२२ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ६३,४३०.०७ | ६९,३२३.५० | ५३,४६५.४३ | २४३,९५९.१७ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | ११,९४५.५० | १२,१३९.२६ | १२,२५९.०८ | ५०,३६०.९३ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | ११,९०६.२६ | ११,८६४.९७ | १२,०७६.७५ | ५०,२२६.८७ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ७,७१४.०० | ९,८३५.१२ | ९,७६८.३४ | ४१,७४९.३२ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | १,१०३.०९ | १०,३५३.७४ | १०,३८२.८६ | ४३,०५४.७४ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,२२१.२१ | १,२२१.२१ | १,२०१.८७ | १,२२१.२१ |
| राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रक व्याज | | | | ११५,८७७.२५ |
| नेट वर्थ | १०९,३६१.९२ | ११४,४४३.०४ | ८०,२४२.१४ | ११४,४४३.०४ |
| निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो | ०.४८ | ०.५२ | ०.९१ | ०.५२ |
| प्रति समभाग प्राप्ती: | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ६३.५९ | ७९.९१ | ७४.२४ | ३३२.३५ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ६३.५७ | ७९.८८ | ७४.१३ | ३३२.०९ |
| डिबेंचर विमोचन राखीव | २,०४६.०० | २,०४६.०० | २,०४६.०० | २,०४६.०० |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | ३.२६ | ९.७४ | ७.१६ | ९.१८ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो | १८.२५ | १७.५९ | ९.२७ | १२.८२ |

**टीप :**
सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ आणि रेग्युलेशन ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

**टी. व्ही. नरेंद्रन**
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक

**कौशिक चॅटर्जी**
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

मुंबई : २५ जुलै, २०२२

TATA STEEL

